जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे






दैनिक | वर्ष १ | अंक १६६ | बुधवार, ७ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त


### महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीला अखेर स्थगिती

**पुणे, ता. ६ :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीला आता मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिलीय. निवडणूक अधिकाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाने यासंदर्भात आदेश दिलेत. दरम्यान आज मुंबई उच्च न्यायालय याबाबत सविस्तर आदेश देणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांसह सुप्रिया सुळेंची मुलगी रेवती सुळे यांना कोर्टाने मोठा झटका दिल्याच बोललं जातय. या प्रकरणी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी निवडणुकीविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून पुणे येथील सर परशुरामभाऊ कॉलेजने देखील स्वतंत्र याचिका दाखल करुन निवडणुकीला आव्हान दिलय.परिणामी, निवडणुकीसाठी नव्याने समावेश कलेल्या मतदारांवर याचिकेत आक्षेप घेण्यात आला आहे. तसेच निवडणूक नियमानुसार होत नसल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आलाय.

# हडपसर-यवत व तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाचे काम लवकरच सुरु होणार?

## महामार्गावरील वाहतूक कोंडी होणार कमी; दोन ते तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण होणार

**लोणी काळभोर, ता. ६ :** महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून पुण्यात दोन महत्त्वाचे रस्ते प्रकल्प हाती घेतले आहे. यामध्ये हडपसर-यवत व तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाचा समावेश आहे. या दोन रस्ते प्रकल्पांच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या निविदेत मोंटेकार्लो लिमिटेड कँपनीने बाजी मारली आहे. लवकरच निविदा अंतिम करून या प्रकल्पांच्या कामाला महिन्याभरात सुरुवात करण्याचे एमएसआयडीसीचे नियोजन असल्याची माहिती मिळत आहे.



हडपसर ते यवत या महामार्गावरील वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येवर कायम स्वरूपी उपाय म्हणून सातत्याने राज्य आणि केंद्र सरकारकडे दौंडचे आमदार राहुल कुल यांनी मागणी केली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून, या प्रकल्पामुळे पूर्व पुणे, हवेली व दौंड तालुक्यातील नागरिकांचे जीवनमान सुधारणार आहे. त्याचबरोबर वाहतूक सुरळीत होईल आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होणार आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील हडपसर ते यवत दरम्यान वाहतूक कोंडी, नागरिकांना होणारा त्रास आणि रस्ता रुंदीकरणासाठी जागेची अडचण लक्षात घेता सहापदरी उन्नत मार्ग (उड्डाणपूल) उभारणी व रस्ता रुंदीकरणाचा प्रकल्प राज्य सरकारने मंजूर केला आहे. हडपसर यवत उन्नत मार्गिकेचेही काम लवकरच केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे पुणे सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असल्याने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत सहा पदरी उन्नत महामार्ग बांधण्याबरोबरच सध्याच्या रस्त्याचेही सहापदीकरण करण्यात येणार आहे.

या प्रकल्पासाठीही एमएसआयडीसीने निविदा मागविल्या होत्या. नुकत्याच आर्थिक निविदा खुल्या करण्यात आल्या असून हा प्रकल्पही मोंटेकार्लो कंपनीने मिळाला असल्याची खात्रीशीर माहिती मिळत आहे. या कामासाठी जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट, वेलस्पून एन्टरप्रायझेस, पको इन्फ्राटेक आणि मोंटेकार्लो लिमिटेड अशा चार कंपन्यांनी निविदा सादर केल्या होत्या. या निविदेतही सर्वात कमी निविदा सादर करून मोंटेकार्लो कंपनीने बाजी मारली. मोंटेकार्लो लिमिटेडने ६४२६.२२ कोटींची निविदा या कंपनीने सादर केली होती. अशोका बिल्डकॉन, पको इन्फ्राटेक, वेलस्पून एन्टरप्रायझेस आणि मोंटेकार्लो लिमिटेड या चार कंपन्यांच्या निविदा या प्रकल्पासाठी सादर झाल्या होत्या. यात सर्वात कमी ६२२१.९५ कोटी रुपयांची निविदा मोंटेकार्लो कंपनीची होती तर सर्वाधिक ७००८.५२ कोटी रुपयांची निविदा अशोका बिल्डकॉन कंपनीची होती. या दोन्ही प्रकल्पाच्या निविदेत मोंटेकार्लो कंपनीने बाजी मारली आहे.

दरम्यान, एमएसआयडीसी तळेगाव चाकण शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डीच्या दुरुस्ती आणि रूंदीकरणाचे काम दोन टप्प्यात करणार आहे. एकूण ५३.२०० किमी लांबीचा हा रस्ते सुधारणा प्रकल्प असून यातील २४.२०० किमीचा टप्पा उन्नत असणार आहे. तर उर्वरित टप्पा जमिनीला समांतर असणार आहे. या प्रकल्पासाठी काही महिन्यापूर्वी एमएसआयडीसीने निविदा मागविल्या होत्या. या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला असून नुकत्याच आर्थिक निविदा खुल्या करण्यात आल्या. त्यानुसार निविदेत मोंटेकॉर्लो लिमिटेड कंपनीने बाजी मारल्याची खात्रीशीर माहिती मिळत आहे.

### प्रवास सुकर करण्याचे नियोजन

या दोन्ही प्रकल्पांच्या निविदेचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. सरकारची मान्यता घेऊन महिन्याभरात कामाला सुरुवात करण्याचे नियोजन असल्याचेही माहिती मिळत आहे. त्यामुळे आता पुण्यातील महत्त्वाच्या अशा दोन रस्ते प्रकल्पांच्या कामास सुरुवात होणार आहे. हे प्रकल्प दोन ते तीन वर्षांत पूर्ण करून प्रवासी वाहनचालकांचा प्रवास सुकर करण्याचे एमएसआयडीसीचे नियोजन आहे.

# पिंपरीत उमेदवाराचा एबी फॉर्म गायब; निवडणूक अधिकाऱ्यावर कारवाई

**पिंपरी, ता. ६ :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीदरम्यान अजित पवार गटाच्या उमेदवार जयश्री भोंडवे यांच्या उमेदवारी अर्जासोबत सादर करण्यात आलेला एबी फॉर्म अचानक गायब झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या गंभीर त्रुटीची दखल घेत उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला असून उमेदवाराला घड्याळ हे निवडणूक चिन्ह देण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, एबी फॉर्म अद्यापही सापडलेला नसल्याने निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




या प्रकरणात निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवत निवडणूक निर्णय अधिकारी हणमंत पाटील यांच्याकडील कामकाज काढून घेण्यात आले आहे. त्यांच्या जागी उपजिल्हाधिकारी अर्चना तांबे यांची नियुक्ती करण्यात आली.

जयश्री भोंडवे यांनी प्रभाग क्रमांक १६ मधून ओबीसी महिला आरक्षणांतर्गत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अर्जासोबत पक्षाचा अधिकृत एबी फॉर्म जोडण्यात आला होता. मात्र, उमेदवारी अर्जाच्या छाननीवेळी एबी फॉर्म उपलब्ध नसल्याचे कारण देत निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांना अपक्ष उमेदवार घोषित केले होते.

या निर्णयाविरोधात जयश्री भोंडवे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांनी अर्ज सादर करतानाचे सीसीटीव्ही फुटेज, व्हिडीओग्राफी तसेच अन्य तांत्रिक पुरावे न्यायालयासमोर सादर केले. या पुराव्यांमध्ये तथ्य आढळून आल्याने न्यायालयाने स्वतंत्र सुनावणी घेऊन प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले.

यानंतर झालेल्या सुनावणीत भोंडवे यांनी मुदतीत उमेदवारी अर्जासह एबी फॉर्म सादर केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी एबी फॉर्म ग्राह्य धरत अंतिम छाननी यादीत दुरुस्ती केली. परिणामी, चिन्ह वाटप प्रक्रियेत जयश्री भोंडवे यांना घड्याळ हे चिन्ह देण्यात आले.

दरम्यान, या गोंधळास जबाबदार ठरलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी हणमंत पाटील यांची बदली करण्यात आल्याने प्रशासनातील कार्यपद्धतीवरही चर्चा सुरू झाली आहे.

# रवींद्र चव्हाणांकडून विलासराव देशमुख यांच्या विधानाबाबत दिलगिरी व्यक्त

**छत्रपती संभाजीनगर , ता. ६ :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या एका वक्तव्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या भाजपच्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना चव्हाण म्हणाले होते की, तुमचा उत्साह पाहून वाटतं, विलासराव देशमुखांची आठवण लातूरमधून पुसली जाईल. हे वक्तव्य बाहेर येताच महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार टीका सुरू केली. लातूरसह राज्यभरातून या विधानावर संताप व्यक्त केला गेला. वाद वाढल्यानंतर अखेर रवींद्र चव्हाण यांनी खुलासा करत दिलगिरी व्यक्त केली.



मी लातूरमध्ये जे बोललो त्याचा अर्थ चुकीचा काढण्यात आला. महानगरपालिकेच्या निवडणुका या नागरी सुविधा कोण चांगल्या देऊ शकतो, यावर असतात. लातूरमध्ये वेगाने विकास व्हावा, एवढंच मी सांगत होतो. मी विलासराव देशमुख यांच्यावर कोणतीही टीका केलेली नाही. ते मोठे नेते होते, मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम केलं आहे.

काँग्रेस पक्ष आजही त्यांच्याच नावावर मत मागतोय, तर मोदीजींच्या नेतृत्वात लातूरमध्ये विकास झाला आहे, हे मी सांगत होतो. विलासराव देशमुख यांचे चिरंजीव धीरज देशमुख माझे मित्र आहेत. त्यांच्या किंवा कुणाच्याही भावना दुखावल्या असतील, तर मी दिलगिरी व्यक्त करतो. चव्हाण यांनी लातूरकरांना विकासाला प्राधान्य देण्याचं आवाहन केलं आणि नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात केंद्र व राज्य सरकार नागरी सुविधोऊ शकतं, असंही त्यांनी सांगितलं.

### धीरज देशमुख यांची तीव्र प्रतिक्रिया

विलासराव देशमुख आणि लातूर यांचं नातं भाजपच्या आकलनाच्या पलीकडचं आहे. रवींद्र चव्हाण यांनी केलेलं वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद आहे. अशा प्रकारचं विधान भाजपकडून अपेक्षित नव्हतं. या वक्तव्यामुळे संपूर्ण लातूरकरांच्या भावना दुखावल्या आहेत. आम्ही या वक्तव्याचा तीव्र निषेध करतो.

# भाजपवर थेट हल्ला नको, खिंडीत गाठा; पुण्यात उमेदवारांना अजित पवारांचा कानमंत्र

**पुणे, ता. ६ :** भाजपच्या ताब्यात असलेली पुणे महानगरपालिका काबीज करण्यासाठी अजित पवार थेट पुण्यात ठाण मांडून मैदानात उतरले आहेत. उमेदवारांना फक्त सूचना न देता, स्वतः एकेकाशी बोलून भाजपविरोधात कसं ठामपणे लढायचं याचा कानमंत्र ते देत आहेत. गेल्या काही वर्षांत तुम्ही काय काम केलं, ते लोकांपर्यंत पोहोचलं पाहिजे. घराघरात जा, लोकांशी थेट संपर्क ठेवा, अशा स्पष्ट सूचना अजित पवारांनी उमेदवारांना दिल्या.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजीनगरमधील तरवडे क्लार्क्स इन येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला पुण्यातील राष्ट्रवादीचे सर्व उमेदवार उपस्थित होते. अजित पवार यांनी प्रत्येक उमेदवाराशी संवाद साधत त्यांची विचारपूस केली आणि आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची दिशा स्पष्ट केली.संघटन मजबूत ठेवा, स्थानिक प्रश्नांवर बोला आणि विकासाचे मुद्दे लोकांपर्यंत पोहोचवा, असं आवाहन त्यांनी केलं. पुढचे आठ-दहा दिवस फार महत्त्वाचे आहेत. प्रचाराचं नीट नियोजन करा, असा सल्लाही त्यांनी दिला.

अजित पवार म्हणाले, तुम्ही प्रभागात काय काम केलंय, ते शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवा. पुढच्या काळात काय करणार आहात, हेही लोकांना सांगा. भाजपच्या सत्तेत कोणती कामं रखडली, कोणती झाली नाहीत, हेही लोकांसमोर ठेवा. राष्ट्रवादी सत्तेत येणं पुण्यासाठी का गरजेचं आहे, हे ठसवून सांगा.

दरम्यान,हीबैठकनिवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. बैठकीदरम्यान उमेदवारांनीही आपली मतं मांडली. काही उमेदवारांनी भाजपकडून सुरू असलेल्या आक्रमक प्रचाराबाबत तक्रार केली आणि जशास तसे उत्तर देण्यासाठी आम्ही तयार आहोत अशी भूमिका मांडली. एकूणच, पुण्यातील राजकारण चांगलंच तापायला लागलं असून, अजित पवारांनी स्वतः मैदानात उतरून राष्ट्रवादीचा प्रचार वेगाने पुढे नेण्यास सुरुवात केली आहे.

# वर्षातील पहिल्या अंगारकी चतुर्थीनिमित्त थेऊरला भाविकांची अलोट गर्दी

## चिंतामणीला विविध रंगेबेरंगी फुलांची आकर्षक आरास

**थेऊर, ता. ६ :** नव्या वर्षातील २०२६ मधील पहिली अंगारकी संकष्ट चतुर्थी असल्याने अष्टविनायकापैकी एक असणाऱ्या श्री क्षेत्र थेऊर (ता. हवेली) येथील चिंतामणी मंदिरात भाविकांनी मंगळवारी (ता. ०६) मोठ्या प्रमाणात पहाटेपासूनच गर्दी केली होती.

पौष महिन्यातील अंगारकी चतुर्थीचा योग आहे. अंगारकी चतुर्थी असल्याने भाविक मोठ्या प्रमाणात चिंतामणीच्या दर्शनासाठी दाखल झाले होते. पहाटे पुजारी महेश आगलावे यांच्या हस्ते श्रींची पूजा करण्यात आली. चिंचवड देवस्थानच्या वतीने चिंतामणीची महापूजा करण्यात आली यावेळी विश्वस्त केशव उमेश विद्वांस उपस्थित होते. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगण आणि मंदिराबाहेर मांडव घालण्यात आले होते, दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली.



चिंतामणी गणपती मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कोकम, विविध प्रकारचे पेरू, तसेच नारळ, दुर्वा विकण्यासाठी महिला विक्रेत्या व नागरिक बसले होते. यावेळी येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करताना दिसून येत होते. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, हार, फुल, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले आदी विक्रेते दिसून येत होते. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांसह विक्रेत्यांची मोठी वर्दळ पहायला मिळत होती.

चिंचवड देवस्थान ट्रस्ट आणि आगलावे बंधूंच्या वतीने मंदिर प्रांगणात मंडप घालण्यात आला होता. देवस्थानच्या वतीने मंदिराबाहेर दर्शन बारी बांधण्यात आली होती तसेच त्यावर छत टाकण्यात आला होता. मंदिरात फुलांची आरास, डेकोरेशन करण्यात आले होते. सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने ह.भ.प.देठे महाराज शास्त्री, पैठण यांचे सुभाष्य कीर्तन झाले. चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघला त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. दरम्यान, जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फेजादा सुरक्षा व्यवस्था करण्यात केली होती. ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. देवस्थानचे विश्वस्त केशव विद्वांस लक्ष ठेवून होते.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### हज यात्रेकरूंसाठी विशेष प्रशिक्षण

उरुळी कांचन, ता. ०५ : हज यात्रा २०२६ साठी खुद्दामे हुज्जाज पुणे जिल्हा कमिटीच्या वतीने १० जानेवारी ते १२ एप्रिल २०२६ या कालावधीत हज यात्रेकरूंसाठी विशेष तरबियती (प्रशिक्षण) कार्यक्रमाचे आयोजन पेन्शनवाला मस्जिद, नाना पेठ येथे केले आहे. गेल्या २० वर्षांपासून खुद्दामे हुज्जाज पुणे जिल्हा कमिटी हज यात्रेकरूंना फॉर्म भरण्यापासून ते प्रवासापूर्वीच्या चार महिन्यांच्या प्रशिक्षणापर्यंत तसेच व्याख्यान, मार्गदर्शन व आवश्यक लसीकरण (इंजेक्शन) आदी सुविधा सातत्याने पुरवत आहे. यावेळी हज कमिटी ऑफ इंडियाचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शहानवाज सी. यांचा खुद्दामे हुज्जाज पुणे जिल्हा कमिटीच्या वतीने कमिटीचे अध्यक्ष हाजी रियाज इस्माईल काझी यांच्या हस्ते सत्कार पार पडला.




### महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीला अखेर स्थगिती

**पुणे, ता. ६ :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीला आता मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिलीय. निवडणूक अधिकाऱ्यांना मुंबई उच्च न्यायालयाने यासंदर्भात आदेश दिलेत. दरम्यान आज मुंबई उच्च न्यायालय याबाबत सविस्तर आदेश देणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवारांसह सुप्रिया सुळेंची मुलगी रेवती सुळे यांना कोर्टाने मोठा झटका दिल्याच बोललं जातय. या प्रकरणी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी निवडणुकीविरोधात मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून पुणे येथील सर परशुरामभाऊ कॉलेजने देखील स्वतंत्र याचिका दाखल करुन निवडणुकीला आव्हान दिलय.परिणामी, निवडणुकीसाठी नव्याने समावेश केलेल्या मतदारांवर याचिकेत आक्षेप घेण्यात आला आहे. तसेच निवडणूक नियमानुसार होत नसल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आलाय.

### राष्ट्रवादी पुणे शहराध्यक्षपदी श्रीकांत पाटील




पुणे, ता. ६ : राष्ट्रवादी काँग्रेस पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पुणे शहर प्रभारी अध्यक्षपदी श्रीकांत पाटील यांची नेमणूक केली आहे. तर स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे यांच्याकडे पुणे शहर निवडणूक समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या विलीनीकराची चर्चा सुरू असतानाच पाटील यांची निवड काही काळासाठी ठरणार का हे पाहणे जरूरीचे ठरणार आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या आदेशानुसार पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी खासदार वंदना चव्हाण यांच्या हस्ते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या शहर कार्यालयात पदभार स्वीकारला.

### बंडखोरांवर पक्षाची शिस्तभंगाची कारवाई

**पुणे, ता. ६ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद्चंद्र पवार पक्षाने प्रभाग १६ आणि प्रभाग २७ याठिकाणी बंडखोर उमेदवारांवर पक्षाने शिस्तभंगाची कारवाई केली आहे. तसे पत्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी जाहीर केले आहे. प्रभाग १६ मधून भाग्यश्री जाधव आणि अविनाश काळे यांना उमेदवारी दिली होती; परंतु दोन्ही पक्षांची संयुक्त बैठक होऊन दोन्ही राष्ट्रवादीने एकमतानं वैशाली बनकर , वर्षा पवार , कमलेश कापरे आणि योगेश ससाणे यांना उमेदवारी दिलीय. हे चौघेही घड्याळाच्या चिन्हावर निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शप) ने जाधव आणि काळे यांना अर्ज मागे घेण्यास सांगितले. मात्र, त्यांनी पक्षाचे ऐकले नाही. त्यामुळे त्यांच्यावर पक्ष शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलीय.

# जिल्हा परिषद निवडणुकांची घोषणा याच आठवड्यात?

## निवडणूक आयोगाचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीचे आदेश; हालचालींना वेग!

**मुंबई, ता. ६ :** राज्यातील राजकारण सध्या चांगलंच तापलं आहे. महापालिकांच्या निवडणुकांचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून सर्व पक्ष जोर लावताना दिसत आहेत. पण याचबरोबर जिल्हा परिषदांच्या निवडणुका नेमक्या कधी लागणार, याकडेही सगळ्यांचं लक्ष लागलं आहे.

डिसेंबरच्या पहिल्याच आठवड्यात निवडणूक आयोग जिल्हा परिषदांचा कार्यक्रम जाहीर करेल, असा अंदाज आधी व्यक्त केला जात होता. मात्र तसं झालं नाही. आता मात्र सुप्रीम कोर्टाची डेडलाईन




जवळ येऊन ठेपली आहे. अवघे दिवस शिल्लक राहिले आहेत. यातच एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीपूर्वी घ्याव्याच लागतील. अन्यथा कोर्टाच्या आदेशाचा अवमान झाल्याचं मानलं जाऊ शकतं.

या आदेशानुसार निवडणूक आयोगाने आधीच नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेतल्या आहेत, तर महापालिकांच्या निवडणुकांची प्रक्रियाही सध्या सुरू आहे.

आता उरतो तो मोठा प्रश्न जिल्हा परिषदांचा. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारीपूर्वीच घ्या, अन्यथा कोर्टाचा अवमान ठरेल, असा स्पष्ट इशारा सुप्रीम कोर्टाने दिला आहे.पुढील एक-दोन दिवसांत जिल्हा परिषद निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची दाट शक्यता आहे.

एकंदरीत, सुप्रीम कोर्टाच्या दबावामुळे निवडणूक आयोगाला वेगाने निर्णय घ्यावे लागत असून, राज्यातील ग्रामीण राजकारणही लवकरच निवडणुकीच्या रणधुमाळीत शिरणार हे जवळपास निश्चित मानलं जात आहे.

### डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे महिला मृत्यूच्या दारात

**मुंबई, ता. ६ :** वैद्यकीय हलगर्जीपणाचा एक अतिशय धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला असून, एका डॉक्टराच्या चुकीच्या उपचारामुळे २८ वर्षीय तरुण महिलेला मृत्यूशी झुंज द्यावी लागत आहे. संबंधित डॉक्टराने आपल्या अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन दिलेल्या चुकीच्या औषधांमुळे या महिलेची प्रकृती खालावली असून, गेल्या दिवसांपासून ती रुग्णालयात मृत्यूशी संघर्ष करत आहे.

आपल्या पत्नीचे प्राण वाचवण्यासाठी हतबल झालेल्या पतीने आपली सर्व पुंजी पणाला लावली आहे.शहर चौक पोलीस ठाण्यात संबंधित डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका निष्पाप जिवाशी खेळणाऱ्या या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात खळबळ माजली आहे.

# अंगारकी संकष्ट चतुर्थीनिमित्त रांजणगाव गणपती येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ०६ : अष्टविनायकापैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव गणपती येथील श्री महागणपतीच्या दर्शनासाठी अंगारकी संकष्ट चतुर्थीनिमित्त भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या जयघोषाने मंदिर परिसर दिवसभर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

अंगारकी संकष्ट चतुर्थीनिमित्त पहाटे पाच वाजता श्रींचा अभिषेक करण्यात येऊन मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले. देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमास भाविकांसह महिलांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. नवीन



वर्षातील ही पहिलीच अंगारकी संकष्ट चतुर्थी असल्याने भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

अंगारकीनिमित्त भाविकांसाठी सुलभ दर्शन व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा आदी सोयी देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आल्या. तसेच पुणे येथील गणेशभक्त प्रदीप मिश्रा व बिंदर सिंधी यांच्या वतीने भाविकांना मोफत खिचडीचे वाटप करण्यात आले.

अंगारकी संकष्ट चतुर्थीनिमित्त दुपारी वाजता देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा व महानैवेद्य अर्पण करण्यात आला. देवस्थान ट्रस्टच्या वतीने मंदिर गाभारा व संपूर्ण मंदिर परिसराची विविधरंगी फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. दुपारी मंदिर सभागृहात श्री महागणपती भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रमही पार पडला.

यावेळी देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, उपाध्यक्ष संदिप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव, उद्योजक दत्तात्रय पाचुंदकर, व्यवस्थापक बाळासाहेब गोऱ्हे, पांडुरंग चोरगे, हिशोबणीस संतोष रणपिसे, देवस्थान कर्मचारी व असंख्य भाविक उपस्थित होते.

दरम्यान, रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर व परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचं निधन

**पुणे, ता. ६ :** काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच आज पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी निधन झालंय. ते ८२ वर्षांचे होते. केंद्रात काँग्रेसची सत्ता असताना सुरेश कलमाडी हे केंद्रीय मंत्री होते. पुण्याच्या राजकारणात सुरेश कलमाडी यांच्या नावाचा मोठा दबदबा होता. इथल्या राजकारणात कलमाडी यांना मानणारा मोठा वर्ग होता. त्यामुळे सुरेश कलमाडी अनेक वर्षे पुण्याचे खासदार राहिले.

एक मोठा काळ कलमाडी यांची पुण्याच्या राजकारणावर पकड राहिली होती. गेल्या काही वर्षांपासून ते आजारपणामुळे राजकारणापासून दूर होते. सुरेश कलमाडी भारतीय वायुसेनेचे माजी वैमानिक होते आणि नंतर राजकारणात सक्रिय झाले. सुरेश कलमाडी भारतीय ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष



होते आणि २०१० च्या दिल्ली राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन समितीचे अध्यक्ष होते. २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या आयोजनात भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप होता, ज्यामुळे त्यांना अटकही झाली होती.

दरम्यान, अनेक वर्षांच्या कायदेशीर लढाईनंतर, एप्रिल २०२५ मध्ये ईडीने या प्रकरणी सादर केलेल्या क्लोजर रिपोर्टनंतर त्यांना क्लीन चिट मिळाली होती. मात्र, त्यानंतर सुरेश कलमाडी हे पुण्याच्या राजकारणात कमबॅक करु शकले नाहीत.

## आम्हाला हिशोब विचारणाऱ्यांनी आधी आरशात बघावं; फडणवीसांचा निशाणा

**पुणे, ता. ६ :** जे लोक आम्हाला कामाचा हिशोब विचारत आहेत, त्यांनी एकदा आरसा पाहावा, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. कात्रज चौक येथे प्रभाग ३८ मधील भाजपा-रिपाइं युतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

पुण्याच्या सर्वांगीण विकासाचा विडा उचलल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, की, येत्या पाच वर्षांत पुण्याचा चेहरामोहरा बदलला जाईल. शहराच्या विकाससाठी आगामी काळात सुमारे ८० हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांच्या योजना राबवण्यात येतील. पुणे हे राज्याचे आर्थिक इंजिन असल्याचे



नमूद करत फडणवीस यांनी गेल्या पाच वर्षांतील कामांचा पाढा वाचला.

या वेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, की अजितदादा अनेक वर्षे पुण्याचे पालकमंत्री होते, मग तेव्हा त्यांना हा भरीव विकास का सुचला नाही? आता केवळ टीकेसाठी टीका करणे चुकीचे आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही अजित पवारांच्या दूरदृष्टीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत पुणेकर विरोधकांना थारा देणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला.

या सभेत भाजपा-रिपाइं महायुतीचे प्रभाग ३८ मधील उमेदवार व्यंकोजी खोपडे, संदीप बेलदरे, राणी भोसले, प्रतिभा चोरघे आणि अश्विनी चिंधे यांच्या विजयाचा संकल्प करण्यात आला. व्यासपीठावर पंकजा मुंडे, माधुरी मिसाळ, शहरातील सर्व आमदार आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपच्या दोन महिला उमेदवार एकमेकांना भिडल्या; भर बैठकीत कार्यकर्त्यांची धराधरी

**पुणे, ता. ६ :** शिस्तबद्ध पक्ष म्हणून टेंभा मिरवणाऱ्या भाजपमध्ये पुणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर अंतर्गत वाद उफाळून आला आहे. प्रभाग क्रमांक २२मध्ये भाजपच्या एकाच पॅनलमधील दोन महिला उमेदवारांमध्ये रविवारी रात्री पक्षाच्या बैठकीदरम्यान जोरदार वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते आमनेसामने आले आणि धराधरी झाली. हे प्रकरण थेट खडक पोलीस ठाण्यापर्यंत जाऊन पोलीस स्टेशनच्या उंबरठ्यावर थांबवून पक्षाकडे वळवले.

रविवारी प्रचार संपल्यानंतर भाजपची अंतर्गत बैठक पार पडली. या वेळी एका महिला उमेदवाराच्या भावाने दुसऱ्या महिला उमेदवारावर मागील निवडणुकीत काम न केल्याचा संदर्भ देत गद्दारीचा टोमणा मारत आरोप केले. मागील निवडणुकीत



जसा दगा दिला तसे या निवडणुकीत करू नका, असा टोमणा मारल्याने दुसऱ्या महिला उमेदवाराच्या पतीचा पारा चढला. त्यानंतर वातावरण तापले आणि त्यातूनच वादाची ठिणगी पडली. एकाच पॅनलमध्ये राहून क्रॉस व्होटिंग टाळण्याबाबत चर्चा सुरू असताना जुन्या जखमा उघड झाल्या. यानंतर दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक होऊन ती हातघाईपर्यंत गेली. रात्री उशिरापर्यंत हा वाद मिटण्याची कोणतीही चिन्हे दिसत नव्हती.

अखेर दोन्ही बाजूंच्या उमेदवारांनी खडक पोलीस ठाणे गाठत एकमेकांविरोधात तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र निवडणुकीच्या तोंडावर पोलीस ठाण्याच्या दारातून हा वाद पक्षाकडे नेल्याची चर्चा होती. वरिष्ठ पातळीवर विषय मांडण्याचे आश्वासन देत कार्यकर्त्यांना शांत करण्यात आले आणि तक्रार दाखल होण्याआधीच प्रकरण थांबवण्यात आले.

## आमदाराचे सुरक्षारक्षक रिव्हॉल्वर घेऊन दारात? सुषमा अंधारेंनी व्हिडिओ केला पोस्ट

**मुंबई, ता. ६ :** अहिल्यानगरमध्ये सध्या राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. समोरच्या पक्षाच्या उमेदवाराने प्रचार करू नये, यासाठी आमदार संग्राम जगताप यांचे स्वीय सहाय्यक आणि बॉडीगार्ड थेट रिव्हॉल्वर घेऊन उमेदवाराच्या घराबाहेर उभे राहत असल्याचा आरोप शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. यासंदर्भात उमेदवाराची आपबीती सांगणारा एक व्हिडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, या आरोपांवर आमदार संग्राम जगताप यांनी मात्र ठाम शब्दांत स्पष्टीकरण देत सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

संग्राम जगताप म्हणाले की, हा व्हिडीओ शेअर करण्यापूर्वी सुषमा अंधारे यांनी त्याची नीट शहानिशा करायला हवी होती. कोणतीही खात्री न करता चुकीची माहिती पसरवून माझी



बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचवेळी त्यांनी सुषमा अंधारे यांच्यावरही टीका करत, हा प्रकार राजकीय हेतूने केल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, सुषमा अंधारे यांनी केलेल्या दाव्यानुसार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे उमेदवार राम माने (काही ठिकाणी राम वाणी असा उल्लेख) यांच्या घराबाहेर आमदार संग्राम जगताप यांचे स्वीय सहाय्यक आणि अंगरक्षक रिव्हॉल्वर घेऊन उभे होते. त्यामुळे उमेदवाराला घराबाहेर पडून प्रचार करता येत नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

सुषमा अंधारे यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये, आमदार जगताप स्वतः सोबत नसतानाही त्यांचे लोक समोरच्या पक्षाच्या उमेदवारावर दबाव टाकत आहेत. रिव्हॉल्वर दाखवून दहशत निर्माण केली जात आहे, असा आरोप करण्यात आला आहे. प्रचारासाठी घराबाहेर पडण्यास मज्जाव करणाऱ्या आ. संग्राम जगताप यांच्या श्री सहाय्यकाने अंगरक्षकाचा व्हिडिओ निकाल शेअर केला होता. अहिल्यानगर येथील प्रभाग क्रमांक एक मधून उभे असणारे उमेदवार राम माने यांना रिवाल्वर चा धाक दाखवत संग्राम जगताप यांच्या लोकांनी कशी दहशत निर्माण केली.

# विद्यार्थ्यांच्या मेहनतीतूनच यशाची वाटचाल होते : कर्णधार रेश्मा पुणेकर

**यवत, ता. ६ :** विद्यार्थ्यांनी सातत्याने आणि प्रचंड मेहनत घेतली, तर यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त तसेच भारतीय महिला बेसबॉल संघाच्या कर्णधार रेश्मा पुणेकर यांनी केले. आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोरिबेल (ता. दौंड) येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांनी आपल्या जीवनप्रवासाचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडला.

रेश्मा पुणेकर म्हणाल्या, मुलींनी शिक्षणाबरोबरच खेळांमध्येही रस घ्यावा. खेळाच्या क्षेत्रात



करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मात्र त्यासाठी मेहनत, वेळ देणे आणि सातत्य आवश्यक आहे. सामान्य कुटुंबातून पुढे येत जागतिक स्तरावर भारतीय बेसबॉल संघाचे नेतृत्व करण्याचा अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला.

या कार्यक्रमास गावचे माजी सरपंच नंदकिशोर पाचपुते, शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे प्राध्यापक संतोष तांबे, उपसरपंच विनोद जगताप, बाळकृष्ण कुंभार,मनीषा गावडे, सदस्य मंगेश जगताप, संतोष पाचपुते, पुनम साळुंखे, मंगलताई चव्हाण, रंभाबाई गुलाबचंद कटारिया, कटारिया हायस्कूल बोरिबेलचे मुख्याध्यापक सुनील मेरगळ, माजी पोलिस अधिकारी सुभाष डोईफोडे, माजी मुख्याध्यापक हरिभाऊ डाळिंबे, माजी शिक्षिका कुंभार मॅडम, समीर मुलानी, ज्ञानेश्वर कुंभार, सामाजिक कार्यकर्ते संजय आटोळे, डॉ. धनसिंग देवकाते, दत्तात्रय खोमणे, नाना जगताप, रत्नागिरी जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी गणेश जगताप, पोटे सर, पिंटूदादा डाळिंबे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच अंगणवाडी सेविका जगताप मॅडम, घागरे मॅडम, मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला वर्गाची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक सुरेश राजगुरू, उपशिक्षक गोरक्षनाथ खेडकर, सहशिक्षिका सारिका खेडकर यांनी केले होते.

# पुण्याचा चेहरामोहरा बदलणार; फडणवीसांची तब्बल ७६ हजार कोटींची महाघोषणा



**पुणे, ता. ६ :** पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी व्हिजन तयार करून आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या आराखड्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केली जाणार आहे. पुणे हे देशातील सर्वोत्तम शहर बनावे, यासाठी प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका जाहीर सभेत स्पष्ट सांगितलेपुणे महापालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ कोंढवा येथे आयोजित सभेत फडणवीस बोलत होते. या वेळी फडणवीस यांनी पुण्याच्या विकासाबाबतच्या अनेक प्रकल्पांबाबत भाष्य केले.

पुण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी ३२ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. यात प्रामुख्याने ५४ कि.मी.चे भुयारी मार्ग विकसित करण्याला प्राधान्य देण्यात येणार आहे. संपूर्ण शहरात मेट्रोचे जाळे विकसित केले जाणार आहे. यातून पुण्याला मेट्रो सिटीचा दर्जा प्राप्त व्हावा, यासाठी प्रयत्न केली जातील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

शहरातील सर्व भागात समान पाणीपुरवठा व्हावा, या अनुषंगाने आगामी काळात योग्य ते नियोजन करून पाणीपुरवठ्याचे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. सध्या ४० टक्के पाणी गळती होत असून, ती १० टक्क्यांपर्यंत आणता येईल, यासाठी आवश्यक ते काम हाती घेण्यात येणार आहे. पायाभूत सुविधांसाठी ४४ हजार कोटींचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

त्याचीही अंमलबजावणी होणार आहे, असेही फडणवीस यांनी नमूद केले आहे. दरम्यान, देशात सर्वांत कमी ९ टक्के रस्ते पुण्यात आहेत. त्यामुळे नवीन रस्ते मार्ग विकसित केले जाणार आहेत. यातून पुण्याचा चेहरामोहराच बदल्यासाठी पुढाकार घेण्यात येणार आहे. पुणे शहर ग्रोथ हब म्हणून ओळखले गेले पाहिजे. असेही त्यांनी स्पष्ट केले.

# लिखित पुसता येतं, कोरलेलं नाही; चव्हाणांच्या वक्तव्यानंतर रितेश देशमुख यांची प्रतिक्रिया

**लातूर, ता. ६ :** राज्यातील महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या सभांना उपस्थिती दर्शवत आहेत. नुकतेच त्यांनी लातूर येथे आयोजित सभेला हजेरी लावली होती. या सभेतून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी काँग्रेसचे जेष्ठ नेते माजी दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याविषयी एक विधान केले आहे. ज्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. या विधानानंतर विलासराव देशमुख यांचा मुलगा अभिनेता रितेश देशमुख याने फेसबुकवरून व्हिडीओ शेअर करत संयमीपणाने प्रत्युत्तर दिले आहे.



लातूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाण शहरात आले होते. यावेळी त्यांनी सभा घेत भाषण केले. या भाषणातून रवींद्र चव्हाण यांनी उपस्थितांना संबोधित करताना दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याबद्दल विधान केले. ते म्हणाले, लातूरमध्ये कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळतोय. हा उत्साह पाहून लक्षात येते की, लातूर शहरातून विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसल्या जातील, यात कोणतीही शंका नाही.

**रितेश देशमुखचे प्रत्युत्तर**

त्यांनी केलेल्या या विधानंतर रितेश देशमुख याने फेसबुकवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे.

या व्हिडीओत, दोन्ही हात वर करून सांगतो. लोकांसाठी जगलेल्या माणसांची नावं मनावर कोरलेल्या असतात. लिहिलेलं पुसता येतं. कोरलेलं नाही. जय महाराष्ट्र. अशा शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे.

## हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला संताप

रवींद्र चव्हाण यांनी स्वर्गीय माजी मुख्यमंत्री विलाराव देशमुख यांच्याविषयी केलेल्या वक्तव्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते रोष व्यक्त करत आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया देत संताप व्यक्त केला आहे. स्व. विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूर जिल्ह्यातून पुसू शकणारा अजून कुणी निर्माण झाला नाही. असे सपकाळ म्हणाले आहेत.

# नसरापूर येथे किरकोळ वादातून सतुराने हल्ल्याचा प्रयत्न; राजगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**विशाल शिंदे**




नसरापूर, ता. ६ : भोर तालुक्यातील नसरापूर येथे भरदिवसा चहाच्या दुकानात धारदार सत्तूर काढून हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत एका शेतकऱ्याच्या हाताला जखम झाली असून, आरोपीविरुद्ध राजगड पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सचिन मानसिंग जाधव (वय ३४, व्यवसाय शेती, रा. नायगाव, ता. भोर) हे सोमवारी (ता. ०५) सकाळी साडेदहाच्या सुमारास मित्रांसह नसरापूर येथील बनेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शनादरम्यान चप्पल काढण्याच्या कारणावरून त्यांचा मंगेश हणुमंत शिंदे (रा. देगाव, ता. भोर) याच्याशी शाब्दिक वाद झाला.


वादानंतरही आरोपी शांत न होता काही वेळाने नसरापूर येथील जानकीराम मंगल कार्यालयाजवळ फिर्यादी यांच्या चारचाकी वाहनासमोर आपली दुचाकी आडवी लावून अडथळा निर्माण केला. त्यानंतर फिर्यादी मित्रांसह नसरापूरमधील एका चहाच्या दुकानात चहा घेत असताना आरोपी तेथे पोहोचला.

यावेळी आरोपीने मफलरमध्ये लपवून आणलेला धारदार सत्तूर अचानक बाहेर काढून फिर्यादीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. स्वतःचा बचाव करताना फिर्यादीने सत्तूर पकडण्याचा प्रयत्न केल्याने झालेल्या झटापटीत त्यांच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला जखम झाली. तसेच आरोपीने जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर सचिन जाधव यांनी तात्काळ राजगड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध आर्म ॲक्टसह भारतीय न्याय संहितेच्या संबंधित गंभीर कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार तळपे करीत असून, दाखल अंमलदार म्हणून म.पो. हवा. निकम यांनी काम पाहिले आहे.

दरम्यान, या घटनेनंतर नसरापूर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित आरोपी यापूर्वीही दहशत निर्माण करणाऱ्या वर्तनासाठी ओळखला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अशा प्रवृत्तीच्या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

# वाढदिवसाला न बोलावल्याने शेतकऱ्याचे घरच पेटवले; तरुणाच्या कृत्याने संपूर्ण कुटुंब रस्त्यावर

**शिरुर, ता. ६ :** वाढदिवसाच्या कार्यक्रमाला बोलावले नाही, या किरकोळ कारणातून निमोणे (ता. शिरूर) येथे एका माथेफिरू तरुणाने शेतकऱ्याच्या घराला आग लावल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत ज्ञानदेव चंदर काळे यांचे घर पूर्णपणे जळून खाक झाले असून रोख रक्कम, दागिने, कपडे व घरगुती साहित्य असे सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेने काळे कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे.



या प्रकरणी निखिल ज्ञानदेव काळे (रा. निमोणे, भोसवस्ती) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल दिली. त्यानुसार अक्षय संतोष वाळुंज (रा. शिंदोडी, ता. शिरूर) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निखिल काळे यांच्या वाढदिवसाला अक्षय वाळुंज याला आमंत्रण न दिल्याने दोघांमध्ये काही दिवसांपूर्वी वाद झाला होता. या घटनेचा राग मनात धरून अक्षय याने बदला घेण्याची धमकी दिली होती.

रविवारी (ता. ०४) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास अक्षय याने काळे यांच्या झोपडीवजा घरावर पेट्रोल ओतून आग लावली. आगीच्या प्रकाशामुळे वेळीच जाग आलेल्या कुटुंबीयांनी घराबाहेर धाव घेतल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, काही मिनिटांतच संपूर्ण घर जळून खाक झाले.

दरम्यान, या घटनेनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, अक्षय वाळुंज हा मोटारसायकलवरून परिसरात फिरत असल्याचे आढळून आले. सध्या तो फरार असून पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत. पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक गोविंद खटिंग अधिक तपास करत आहेत.

दरम्यान, या आगीत काळे कुटुंबाचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याने निमोणे येथील ग्रामस्थांनी मदतीचा हात पुढे केला आहे. लोकवर्गणीच्या माध्यमातून आर्थिक मदत जमा करून ग्रामस्थांनी माणुसकीचे दर्शन घडवले असून पीडित कुटुंबाला मानसिक आधार देण्याचाही प्रयत्न केला जात आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## केळी आरोग्यासाठी महत्वाची

**पुणे, ता. ६ :** आपल्याकडे केळी हे फळ अगदी सहजसुलभ उपलब्ध होते. बारही महिने मिळणारी ही केळी आपल्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाची मानली जाते. दररोज केळी खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. केळी सहज पचणारे, पौष्टिक आणि ऊर्जादायी फळ आहे. नियमितपणे केळी खाल्ल्याने शरीराला अनेक प्रकारचे लाभ मिळतात.

मानसिक आरोग्यासाठी लाभदायक केळीमध्ये ट्रिप्टोफॅन असते, जे शरीरात सेरोटोनिन तयार करण्यास मदत करते. त्यामुळे तणाव कमी होतो आणि मूड चांगला राहतो.

हाडे व स्नायूंना बळकटी केळीतील खनिजे व व्हिटॅमिन्स स्नायूंच्या आकडी कमी करतात आणि हाडे मजबूत ठेवण्यास मदत करतात.

त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर केळीमध्ये असलेली पोषक तत्त्वे त्वचा तेजस्वी ठेवतात आणि केस मजबूत करतात.

ऊर्जा वाढवते केळीमध्ये नैसर्गिक साखर (ग्लुकोज, फ्रक्टोज) आणि कार्बोहायड्रेट्स असतात. त्यामुळे थकवा दूर होतो आणि शरीराला तत्काळ ऊर्जा मिळते. व्यायामापूर्वी किंवा कामाच्या दरम्यान केळी खाणे फायदेशीर ठरते.


पचन सुधारते केळीमध्ये फायबर भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे बद्धकोष्ठता कमी होते आणि पचनक्रिया सुरळीत राहते. ॲसिडिटी व गॅसचा त्रासही कमी होण्यास मदत होते.

हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त केळी पोटॅशियमचा उत्तम स्रोत आहे. पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत होते.

वजन नियंत्रणात मदत केळी खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते, त्यामुळे वारंवार भूक लागत नाही. योग्य प्रमाणात केळी घेतल्यास वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

### संक्षिप्त

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली



**पुणे, ता. ६ :** माजी केंद्रीय मंत्री, पुणे शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणारे सुरेश कलमाडी यांच्या निधनाने पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून अनुभवी ज्येष्ठ नेतृत्व हरपले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोक भावना व्यक्त करत माजी खासदार सुरेश कलमाडी यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोक संदेशात म्हणतात की, भारतीय हवाई दलात पायलट म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करून सुरेश कलमाडी यांनी पुणे शहराच्या राजकीय, सामाजिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात ठसा उमटवला. पुण्याचे खासदार, केंद्रीय मंत्री तसेच भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दीर्घकाळ योगदान दिले. त्यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन सारख्या उपक्रमांमुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पुण्याची वेगळी ओळख निर्माण झाली. दरम्यान, पुणे शहराच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने एक अनुभवी नेतृत्व हरपले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## भाजपसह सर्वच पक्षात अंतर्गत वॉर

**पुणे, ता. ६ :** महापालिका निवडणुकीसाठी सर्वच पक्षात उमेदवारी मिळविण्यासाठी चुरस होती. उमेदवारी मिळाली नाही तेव्हा त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरत नाराजी जाहीर केली. त्यानंतर पक्षाकडून या नाराजांना स्विकृत सदस्य, पक्षीय समित्या तसेच वेगवेगळ्या शासकीय समित्यांची आश्वासने देत अर्ज माघारी घेण्यास भाग पाडले आहे. मात्र, त्यानंतर हे नाराज पक्ष उमेदवारच्या प्रचारातून गायब आहेत. उमेदवारीसाठी पात्र असताना डावले गेल्याने या इच्छुकांना भेटण्यास पक्षाचे आमदार तसेच नेते भेटत असले तरी हे नाराज प्रचारात उतरण्यास तयार नाहीत. त्यामुळे नवीन उमेदवारी मिळालेल्या उमेदवारांना प्रचाराचा अनुभव नसल्याने त्यांची चांगलीच कोंडी होतीय.

# विकासाभिमुख हिंदुत्वाचा विचार, म्हणून भाजपा पुन्हाचा निर्धार!



**पिंपरी-चिंचवड, ता. ६ :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी शहरवासीयांना नवीन वर्षाच्या शुभेच्छांसह भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. याबाबत त्यांनी सोशल मीडियावर सविस्तर व्हीडिओ पोस्ट केला आहे.त्यामध्ये शहरातील प्रमुख विकासकामांचा आढावा घेत आगामी काळात शाश्वत विकासासाठी भाजपाला पुन्हा साथ द्या, असे भावनिक आवाहन केले आहे.

आमदार लांडगे यांनी २०१७ पासून पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू झालेल्या विकासप्रक्रियेचा उल्लेख करत मेट्रो, नदी सुधार प्रकल्प, वेस्ट-टू-एनर्जी, आयआयएम, सीओईपी, स्पोर्ट्स सिटी, ग्रीन सिटी आणि रेसिडेन्शियल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांची माहिती दिली. शहरात देवेंद्र पर्व सुरू झाले असून अनेक प्रकल्प मार्गी लागले आहेत. काही प्रकल्प पूर्णत्वाच्या दिशेने तर काही प्रगतीपथावर आहेत, असे त्यांनी नमूद केले.

राज्य आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने आगामी काळात शहरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिक बळ मिळेल, असा दावा त्यांनी केला.

> भाजपा सत्ताकाळात पिंपरी-चिंचवडच्या विकासाचा प्रवास हा केवळ घोषणांचा नव्हे, तर प्रत्यक्ष कामांचा आहे. मेट्रोपासून शिक्षण, पर्यावरण, क्रीडा आणि पायाभूत सुविधांपर्यंत सुरू असलेली विकासाची चक्रे ही विश्वासातून निर्माण झाली आहेत. हा विश्वास अधिक बळकट करत, शहराच्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढील पाच वर्षेही समर्पित भावनेने काम करण्याचा आमचा ठाम निर्धार आहे. कारण, विकासासाठी भाजपाशिवाय पर्याय नाही आणि शहराचे उज्ज्वल भविष्य हे आपले सामूहिक ध्येय आहे.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

शहरातील निर्णय शहरातच व्हावेत, या भूमिकेतून महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत, असेही पत्रकात म्हटले आहे.

नवीन वर्षाच्या निमित्ताने नागरिकांनी विकासाला मत देत भाजपाच्या अधिकृत उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून द्यावे, असे आवाहन करत त्यांनी एक मत शहराच्या विकासात योगदान देणारे ठरेल, असे प्रतिपादन केले. तसेच विकासाभिमुख हिंदुत्वाच्या विचाराने शहर उज्ज्वल भविष्याकडे नेण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. शेवटी आमदार लांडगे यांनी नागरिकांना पुन्हा एकदा नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत आपला पक्षभाजपा आणि आपला उमेदवारकमळ, असा संदेश दिला आहे.

## भाजपची काँग्रेससोबत युती;अंबरनाथमध्ये राजकीय भूकंप

**ठाणे, ता. ६ :** जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून, अंबरनाथ नगरपरिषदेत सत्ता स्थापनेसाठी भाजपने चक्क काँग्रेससोबत हातमिळवणी केलीय. यामुळे राज्यात महायुतीत असलेल्या शिंदे गटाला मोठा धक्का बसलाय. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ५९ जागांपैकी शिंदे गटाने सर्वाधिक २३ जागा जिंकल्या, तर भाजपने १६, काँग्रेसने १२ आणि अजित पवार गटाने ४ जागांवर विजय मिळवला.

भाजपने काँग्रेस आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या मदतीने ३२ नगरसेवकांचे संख्याबळ जुळवत सत्ता काबीज केली. भाजपच्या तेजश्री करंजुले नगराध्यक्षपदी विराजमान झाल्यात. शिंदे गटाचे आमदार बालाजी किणीकर यांनी याला विश्वासघात म्हणत ही अभद्र युती असल्याची टीका केली. दुसरीकडे, शिंदे गटाचा भ्रष्टाचार रोखण्यासाठीच ही भूमिका घेतल्याचे भाजप उपाध्यक्ष गुलाबराव करंजुले यांनी स्पष्ट केले.

## रस्ता रुंदीकरणाच्या कामात अपघात वृक्षतोडीत कामगार गंभीर जखमी

### पंढरपूर-महाड रस्त्यावरील घटना

इम्रान आत्तार

भोर, ता. ६ : पंढरपूरमहाड रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू असताना वृक्षतोड करताना झालेल्या अपघातात एका कामगाराला गंभीर दुखापत झाल्याची घटना सोमवारी (ता. ०५) दुपारी चारच्या सुमारास घडली. या अपघातात नितीन तानाजी पिलाणे (वय-३०, रा. महुडे बुद्रुक) हा कामगार गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



पंढरपूरमहाड रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मोठ्या आकाराच्या झाडांची तोड सुरू आहे. भोररामबाग रोडच्या हद्दीत सुमारे २०० ते २५० वर्षे जुना डेरेदार वडाचा वृक्ष होता, ज्यापासून तीन मोठी झाडे तयार झाली होती. या वृक्षाची तोड ठेकेदारामार्फत करण्यात येत होती. नितीन पिलाणे हा कामगार क्रेनच्या बकेटमध्ये उभा राहून कटरच्या सहाय्याने झाडाची फांदी कापत असताना फांदीचा अचूक अंदाज न आल्याने ती फांदी थेट क्रेनच्या बकेटवर कोसळली. त्यामुळे बकेट तुटून नितीन पिलाणे रस्त्यावर पडला आणि तो गंभीर जखमी झाला.

अपघातानंतर त्याला तत्काळ भोर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातानंतर रस्त्यावर झाडांच्या मोठ्या फांद्या पडल्याने दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. तसेच मांढरदेवी व काळुबाई यात्रेनिमित्त भाविकांची मोठी वर्दळ या मार्गावर असल्याने वाहतूक कोंडी आणखी वाढली. दरम्यान, घटनास्थळी भोर पोलीस ठाण्याचा कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सार्वजनिक रस्त्यावर सुरू असलेल्या धोकादायक कामावेळी पोलीस बंदोबस्त नसल्याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

## शिखर धवन चढणार बोहल्यावर



**नवी दिल्ली, ता. ६ :** भारतीय क्रिकेट संघाचा धडाकेबाज माजी सलामीवीर शिखर धवन आयुष्याची नवी इनिंग सुरू करणार आहे. शिखर लवकरच दुसऱ्यांदा विवाहबंधनात अडकणार असून त्याच्या होणाऱ्या पत्नीचे नाव सोफी शाइन आहे. सोफी ही आयर्लंडचीरहिवासी असूनया दोघांच्या लग्नाची सध्या सोशल मीडियावर मोठी चर्चा रंगली आहे. फेब्रुवारी २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात दिल्लीमध्ये हा शाही विवाह सोहळा पार पडणार असल्याचे समजते.

शिखर आणि सोफीची मैत्री गेल्या काही काळापासून आहे. २०२५ मध्ये दुबईत झालेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या एका सामन्यावेळी हे दोघे पहिल्यांदा सार्वजनिकरित्या एकत्र दिसले होते. तेव्हापासूनच त्यांच्या नात्याबद्दल तर्कवितर्क लढवले जात होते. सोफीने मार्केटिंग क्षेत्रात उच्च शिक्षण घेतले असून ती एक यशस्वी व्यावसायिक महिला म्हणून ओळखली जाते. दुबईतील एका कार्यक्रमात त्यांची पहिली भेट झाली होती.

दरम्यान, आपल्या आयुष्यातील कठीण काळानंतर शिखरने पुन्हा एकदा आनंदाने पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. शिखर धवनचे हे दुसरे लग्न असेल. याआधी त्याचे लग्न आयशा मुखर्जीशी झाले होते. त्यांना जोरावर नावाचा ११ वर्षांचा मुलगाही आहे. दिल्लीत होणाऱ्या या लग्नासाठी भारतीय क्रिकेट टीममधील त्याचे सहकारी आणि बॉलिवूडमधील प्रसिद्ध कलाकार हजेरी लावण्याची शक्यता आहे. या बातमीमुळे शिखरच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## लोणी काळभोर परिसरातून १६ वर्षीय मुलीचे अपहरण

**लोणी काळभोर, ता. ६ :** मोबाईल फोनचा चार्जर आणण्यासाठी गेलेल्या एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात इसमाने अपहरण केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरात घडली असून सोमवारी (ता. ५) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या बहिणीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञास इसमाच्या विरोधात अपहरणासह विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी या लोणी काळभोर परिसरात राहतात. फिर्यादी यांच्याजवळ त्यांची अल्पवयीन मुलगी राहत होती. सोमवारी सकाळी मोबाईल फोन चा चार्जर आणण्यासाठी अल्पवयीन मुलगी घरातून बाहेर पडली होती. ती पुन्हा माघारी आली नाही. त्यानंतर मुलीच्या नातेवाईकांनी सगळीकडे चौकशी केली. परंतु, ती कोठेही आढळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अल्पवयीन मुलीच्या बालमनाचा फायदा घेऊन फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेले आहे. अशी फिर्याद अल्पवयीन मुलीच्या २० वर्षीय बहिणीनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात आरोपीच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम१३७(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के करत आहेत.

## दौंडमध्ये निष्काळजीपणाचा बळी; ऊसाच्या ट्रकमधील दोरीमुळे दुचाकीस्वाराचा मृत्यू

**दौंड, ता. ६ :** ऊसाने भरलेल्या ट्रकमधील मोकळी रस्सी रस्त्यावरून निघालेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावर पडल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. तर त्याची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. ही घटना दौंडनगर रस्त्यावर सोमवारी (ता. ०५) सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास दौंड शहरातील योगराज हॉटेलसमोर घडली. या प्रकरणी अज्ञात ट्रकचालकाविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




अकबर करीम शेख (वय ३८, रा. ओम शांतीनगर, गजानन सोसायटी दौंड ता. दौंड) असे अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीचालकाचे नाव आहे. तर नसरीन अकबर शेख (वय -२८) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी मयत अकबर शेख याचा भाऊ शाहिद करीम शेख, वय ३२ वर्षे, व्यवसाय खरेदी विक्री, रा. सदर) यांनी दौंड पोलीस ठाण्यात अज्ञात ट्रकचालकाच्या विरोधात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाहिद शेख यांचे भाऊ अकबर करीम शेख आणि वहिनी नसरीन अकबर शेख हे होंडा ॲक्टिव्हा दुचाकी वरून शालीमार चौकाकडून गजानन सोसायटीकडे जात असताना समोरून येणाऱ्या टाटा कंपनीच्या ऊसाने भरलेल्या ट्रक वरील रस्सी अचानक सैल होऊन उडाली.

ही रस्सी थेट दुचाकीवरील दोघांच्या अंगावर पडून त्यांच्या गळ्याभोवती आवळली गेली. त्यामुळे झालेल्या अपघातात अकबर शेख यांना गंभीर व किरकोळ दुखापती होऊन त्यांचा मृत्यू झाला, तर नसरीन शेख या गंभीर जखमी झाल्या आहेत. या अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले आहे. अपघात घडूनही संबंधित ट्रकचालकाने मदत न करता घटनास्थळावरून पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, ट्रकचालकाने वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवत, आवश्यक खबरदारी न घेता भरधाव व बेदरकारपणे वाहन चालविल्या प्रकरणी मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४, १३४ व १७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक बिद्री पुढील तपास करीत आहेत.

## कोकणकड्यावर रॅपलिंग करणाऱ्या आरती ठाकरे ठरल्या राज्यातील पहिल्या महिला शिक्षिका

**पुणे, ता. ६ :** आजच्या युगात स्त्रिया पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. शिक्षिका ते कलेक्टरपर्यंत, नगरसेविका ते पंतप्रधानापर्यंत इ. विविध क्षेत्रांत स्त्रियांनी मानाच्या जागा आपल्या कुशलतेच्या स्वबळावर पटकावल्या आहेत. पुणे जिल्हा परिषदेच्या एका हिरकणीची माहिती जाणून घेणार आहोत. की तिने हरिश्चंद्रगड येथील १८०० फुट कोकणकड्यावर रॅपलिंग करून एक पराक्रम केला आहे. त्यांचे नाव आरती मनोहर ठाकरे असे आहे.



आरती ठाकरे या कडवस्ती (तालुका खेड जिल्हा पुणे) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून काम करतात. त्यांना रॅपलिंगची खूप आवड आहे. मी फिट माझी शाळा फिट या संकल्पनेतून त्यांनी हरिश्चंद्रगड कोकणकड्यावर रॅपलिंग करण्याचा निर्णय घेतला होता. ठाकरे यांनी हरिश्चंद्रगड येथील १८०० फुट चा कोकणकडा रॅपलिंगच्या एडवेंचर प्रकार करून पार केला आहे.

हरिश्चंद्रगड कोकणकडा, नुसतं बघताच काळजात धडकी भरवणारा आहे. हा कोकणकडा अतिशय थरारक अनुभव डोळ्यांना देतो. तेथे असलेले उंचीवरील धुके आणि वाऱ्याचा वेग या प्रचंड प्रतिकूल परिस्थितीमध्ये आरती ठाकरे यांनी हा थरारक एडवेंचर पार केला आहे. हा कडा पार करून त्यांनी महाराष्ट्रातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या आहेत. पुणे झेडपीच्या शिक्षकांसमोर त्यांनी एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

**रॅपलिंग म्हणजे काय?**

रॅपलिंग म्हणजे दोरीच्या साहाय्याने उंच ठिकाणाहून (उदा. डोंगर, कडा, धबधबा) नियंत्रित पद्धतीने खाली उतरण्याची एक साहसी गिर्यारोहण क्रिया आहे, ज्यात घर्षण वापरून उतारावर नियंत्रण मिळवले जाते, हे गिर्यारोहण आणि बचाव कार्यांमध्ये वापरले जाते. यासाठी दोरी, हार्नेस , आणि रॅपेल उपकरण यांसारख्या साधनांची आवश्यकता असते आणि हे तंत्र पर्वतांवरून सुरक्षितपणे खाली उतरण्यासाठी वापरले जाते.

# लोणी काळभोर येथे बारावीच्या विद्यार्थिनीची छेडछाड करणाऱ्या आरोपीला अटक

**लोणी काळभोर, ता. ६ :** बारावीच्या विद्यार्थिनीचा पाठलाग, छेडछाड करून बाललैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत शनिवारी (ता.३) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या गुन्ह्यातील आरोपीला लोणी काळभोर पोलिसांनी तत्काळ अटक केली आहे.

वैभव संजय शिरवाळे (कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी ३४ वर्षीय महिलेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी या लोणी काळभोर परिसरात राहतात. त्यांना एक १७ वर्षाची मुलगी असून ती लोणी काळभोर परिसरातील एका नामांकित शैक्षणिक संकुलात बारावीच्या वर्गात शिक्षक घेत आहे.

शिरवाळे याने त्याचा इंस्टाग्राम अकाऊंटवरून अल्पवयीन मुलीच्या अकाऊंट वरती मला तुझे बरोबर बोलायचे आहे. असा मॅसेज केले आहे. त्यावर फिर्यादी यांच्या मुलीने तु मला मॅसेज करु नकोस. मी तुझ्या चुलत्याला मॅसेज करुन सांगेन असा मॅसेज करून आरोपी शिरवाळेला सांगितले होते.

दरम्यान, पिडीता या नेहमीप्रमाणे शनिवारी सकाळी शाळेत चालल्या होत्या. तेव्हा आरोपी शिरवाळे हा दत्त मंदीराच्या जवळ अगोदरच थांबला होता. त्याने अल्पवयीन मुलीकडे एकटक पाहुन तिचा घरापर्यंत पाठलाग केला. मुलगी अल्पवयीन आहे हे माहीती असताना सुध्दा आरोपीने तिच्या अल्पवयीनपणाचा फायदा घेऊन तीचा विनयभंग केला आहे. याप्रकरणी पिडीतेच्या आईने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी शिरवाळे याच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७८, लैंगीक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ कलम १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच, लोणी काळभोर पोलिसांनी आरोपी वैभव शिरवाळे याला तत्काळ अटक केली आहे.




ही कामगिरी पुणे शहर पोलीस अपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, सोमनाथ नाळे, पोलीस उपनिरीक्षक अनिल जाधव, पोलीस अंमलदार सचिन सोनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.